सं.फौ.ख.क्र.१००८/२०२२
सरकार -वि- राहुल, **नि.क्र.१६**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – छाया सुरेश चावके

वय. ४० वर्षे, व्यवसाय – मजुरी, राह. – हसारा, ता. तुमसर, जिल्हा – भंडारा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्री. पी.आर. भलावी सरकारी वकील यांच्या मार्फत</u>**

घटना तीन वर्षांपुर्वी घडली होती. त्यादिवशी मी माझे मुलासोबत सायकलने माझे कामावर जात होते. आम्ही सरकारी दवाखान्यासमोर आलो असता एका चारचाकी गाडीने आमच्या सायकलला पुढुन धडक दिली. त्या धडकेत आम्ही दोघेही खाली पडलो. मला डोक्याला जखम झाली. माझ्या मुलाला कमरेत जखम झाली. त्यानंतर आम्हाला सरकारी दवाखान्यात नेण्यात आले. सदर वाहन चालकास मी पाहिले नव्हते. मी त्याला ओळखु शकणार नाही.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. रावलानी यांच्या मार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, सरकारी दवाखान्यासमोरील रस्त्यावर गतीरोधक आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्या लगत असलेल्या रिजवी यांच्या घरासमोर देखील गतीरोधक आहे. हे म्हणणे खरे आहे की, गतीरोधक असल्यामुळे वाहने संथ गतीने जात असतात. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्यावर सकाळच्या वेळेस लोकांची वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपघातात आमची चुक होती.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (आर. पी. बाठे) | (आर. पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. १६.०४.२०२६ | दि. १६.०४.२०२६ |